# शेतकऱ्यांच्या पसंतीचा महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड 'महापीक'



'महापीक'चे मॅनेजिंग डायरेक्टर सुहास कचरे.

**तेलंगवाडी (ता. मोहोळ) येथील सुहास रमेश कचरे हे नाव आज उद्योजक म्हणून नावारूपास आले आहे. महाराष्ट्रातील अव्वल खत कंपनी 'महापीक'चे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून ते काम पाहत आहेत. शेतकऱ्याच्या मुलाची कंपनी म्हणून 'महापीक' ब्रॅण्डची ओळख तयार झाली आहे.**

* युरोपातून आयात केलेले ट्रेस इलिमेंट फर्टिलायझर
* सोडियम आणि क्लोरीन मुक्त विद्राव्य खते
* चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्ये व दुय्यम अन्नद्रव्ये
* सेंद्रीय भू-सुधारके



'महापीक'ची विविध उत्पादने.

सुदर्शन सुतार

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर शेटफळनजीक तेलंगवाडी हे सुहास कचरे यांचे गाव. वडील रमेशतात्या कचरे हे प्रगतिशील, प्रयोगशील शेतकरी म्हणून ओळखले जातात. त्यांची जिद्द, मेहनत, धडपड वाखाणण्याजोगी आहे. रमेशतात्यांना २०१८ मध्ये माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते प्रयोगशील शेतकरी म्हणून पुरस्कार मिळाला. सुहास यांच्या आई सौ. सुनीता आणि वडील रमेशतात्यांना आपल्या मुलानेही असेच काहीसे वेगळे करावे, असे वाटायचे. सुहास यांच्यातील व्यावसायिक गुण हेरून त्यांना शेतीशी निगडित व्यवसायात पाठबळ द्यायचे त्यांनी ठरवले. त्यातूनच 'महापीक फर्टिलायझर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' ही कंपनी उदयास आली. आज महाराष्ट्रातील आघाडीची खत कंपनी म्हणून महापीक फर्टिलायझर्स ओळखली जाते.

वास्तविक पाहता सुहास हे अत्यंत जिद्दी, मेहनती स्वभावाचे पण त्यांना शिक्षणाची फारशी गोडी दिसत नव्हती. रमेशतात्यांनी सुहास लहान असल्यापासूनच त्याच्या शिक्षणाची काळजी वाटू लागली. पुढे सुहास यांना शिक्षणासाठी सोलापूरमध्ये प्रा. केशव शिंदे यांच्या सुयश गुरुकुलमध्ये पाठविण्यात आले. गुरुकुलमधील शिस्त आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सुहास यांची जडणघडण होत गेली. शाळेतील अनेक गरीब विद्यार्थी अतिशय काटकसरीने आपल्या गरजा जेमतेम ठेवून राहत होते, हे सुहास यांनी पाहिले. तेव्हा सुहास यांच्यात आणखीनच बदल झाला. साहजिकच शिक्षणाची गोडी वाढली.

## वडिलांकडून घेतले शेतीचे धडे

महाविद्यालयात असताना सुट्टीमध्ये गावी आल्यानंतर सुहास यांना रमेशतात्या शेतामध्ये घेऊन जायचे. शेतातील पाइपलाइन जोडणे, ठिबक तपासणी, मल्चिंग पेपर अंथरणे, रोपांची लागवड, जमिनीची मशागत, फवारणी आदी शेती कामे सुहास यांना रमेशतात्यांनी शिकवली. तसेच डाळिंब छाटणी, झाडावर कलम करणे यासह शेततळ्यातील पाण्याचा वापर, सिंचनातील स्वयंचलित तंत्र आदींची माहिती देत गेले. एकप्रकारे सुहास यांना शेतीशिक्षणाचे धडे वडीलांकडूनच मिळत गेले. सुहास यांच्यासाठी रमेशतात्या म्हणजे शेतीचे विद्यापीठच ठरले.



'महापीक' कंपनीतील उत्पादनांचे पॅकिंग युनिट.

## 'महापीक'चा श्रीगणेशा

कॉलेजातील एका कार्यक्रमाच्या निमित्ताने सुहास यांना २०१० मध्ये माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचे भाषण ऐकायला मिळाले. त्यावेळी पवार साहेबांनी उपस्थित सर्व विद्यार्थांना फक्त शेती करू नका, शेतीवर आधारित कृषी उद्योग करा असा सल्ला दिला. त्याची तशी विस्तृत कारणेही दिली. त्यांच्या या भाषणाने सुहास भारावून गेले. पवार साहेबांच्या भाषणातील मुद्दे सुहास यांनी रमेशतात्यांना सांगितले.

येत्या काळात शेतीमध्ये सिंचनासाठी ठिबक संचाची वाढती मागणी पाहता, आपण विद्राव्य खतांचा उद्योग उभारू असा रमेशतात्यांनी विचार केला. उद्योगासाठी रमेशतात्यांनीच 'महापीक' हे ब्रॅण्डचे नाव सुचवले. त्यामागे महाराष्ट्रातील शेती म्हणजे महापीक असा व्यापक अर्थ असल्याची संकल्पना तात्यांनी मांडली. आणि अशारीतीने १ सप्टेंबर २०१६ रोजी महापीक ब्रॅण्डचा उदय झाला.

## अनुभवातून पायाभरणी

कृषी उद्योग उभारणी डोळ्यासमोर ठेवून सुहास यांनी पदवी शिक्षणानंतर अॅग्री बिझनेस मॅनेजमेंटसाठी आकुर्डी (पुणे) येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या ठिकाणी मार्केटिंगमधील बेसिक माहिती त्यांना मिळाली. त्यांनी कॉलेजच्या माध्यमातून विविध कंपन्यांना भेटी देत कामकाज, विक्री व्यवस्था आदी बाबींविषयी माहिती घेतली. रमेशतात्या सुहास यांना भेटायला जाताना आवर्जून आपल्यासोबत यशस्वी उद्योजकांची पुस्तके घेऊन जात. प्रतापराव पवार यांचे 'वाटचाल' हे पुस्तक सुहास यांच्यासाठी टर्निंग पॉइंट ठरले. तात्या एवढ्यावरच न थांबता सुहास यांना स्वतःची कृषी उत्पादक कंपनी काढायची आहे, याची सतत जाणीव करून देत. त्यासाठी सुहास यांना विद्राव्य खतांच्या कंपनीमध्ये मार्केटिंगसाठी १ वर्ष आणि प्रॉडक्शन विभागामध्ये १ वर्ष काम करायला लावले. आज मार्केटमध्ये विक्रेता नेमणे, त्यांना पॅकिंग दाखविणे, उत्पादनांचे सॅम्पल (नमुने) दाखविणे, शेतकऱ्यांच्या भेटी घेणे तसेच त्यांच्या उत्पादनांचे पिकावर प्रात्यक्षिक घेणे यासर्व गोष्टी स्वतःच्या कंपनीसाठी करताना सुहास यांना महाविद्यालयातील अनुभव कामी आला. विविध टप्प्यांवर रमेशतात्यांचा मिळालेला सल्ला, साथ आणि अनुभवाचे बोल यामुळेच सुहास हे आज यशस्वी उद्योजक बनले.



'महापीक'चे मॅनेजिंग डायरेक्टर सुहास कचरे थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधतात.




'महापीक' फर्टिलायझरने आपल्या उत्पादनांच्या प्रचारासाठी अशी गाडी तयार केली आहे.

## 'महापीक'चा यशस्वी ब्रॅण्ड

अलीकडेच १ सप्टेंबर २०२१ रोजी कंपनीने पाच वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत महापीक ब्रॅण्डला यशाच्या टप्प्यावर आणले आहे. सध्या कंपनीकडे विद्राव्य खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, नॅनो टेक्नॉलॉजीवर आधारित ट्रेस इलेमेंट खते, सेंद्रिय भूसुधारक खते अशी सुमारे २८ प्रकारची विविध उत्पादने आहेत. या उत्पादनांना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत मोठी मागणी आहे.

**महाराष्ट्राचा महाब्रॅण्ड 'महापीक' म्हणून ओळख तयार करताना वेळोवेळी कुटुंबातील सदस्यांची मोलाची साथ मिळत गेली. कंपनीची उभारणी आणि यशस्वी वाटचालीकरिता आई-वडिलांची दूरदृष्टी आणि साथ वेळोवेळी माझ्या कामी आली. त्यामुळेच हे यश मिळाले. २०२२ पर्यंत कंपनीच्या सर्व उत्पादनांची ऑनलाइन पद्धतीने विक्री करत व्यवसाय वाढविण्याचा माझा मानस आहे.**

**- सुहास कचरे,**
व्यवस्थापकीय संचालक, महापीक

## कंपनीची स्वतःची विक्री केंद्रे

कंपनीने अवघ्या ५ वर्षांतच संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र व्यापला आहे. उत्कृष्ट सेवा, प्रामाणिकपणा आणि दर्जेदार गुणवत्तेमुळे कंपनीची विविध उत्पादने शेतकऱ्यांच्या पसंतीला उतरली आहेत. सध्या वितरकांमार्फत उत्पादनांची विक्री केली जाते. पण भविष्यात शेतकऱ्यांना थेट सेवा देण्यासाठी कंपनी स्वतःची विक्री केंद्रे उभारण्याचा विचार करत आहे. त्यादृष्टीने तयारीही सुरू केली आहे.

९९२११३२४११
**महापीक फर्टिलायझर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, तेलंगवाडी (जि. सोलापूर)**
customercare@mahapeek.com
www.mahapeek.com